

स्वप्नाली मठकर

उद्योगभरारी

# ‘कचऱ्याला आपलं म्हणा’

**कचऱ्यातून खतनिर्मिती होते, बायोगॅसही तयार होतो पण त्यावर कडी करत निर्मला कांदळगांवकर यांनी कचऱ्यापासून वीजनिर्मितीही सुरू केली आहे, इतकंच नव्हे तर याच कचऱ्यातून अनेक स्त्रियांसाठी रोजगार उपलब्ध झाला असून कचरा वेचण्यातून ‘स्वच्छ भारत’ उद्दिष्टही साध्य होत आहे. कचऱ्यालाच आपलं भांडवल बनवून सुरू झालेली ‘विवाम’ अ‍ॅग्रो टेक ही कंपनी आता ‘विवाम’ सॉलिड वेस्ट मॅनेजमेंट प्रा. लिमिटेड कंपनी झाली आहे. या भरारीविषयी...**

मुलं मोठी झालीत. त्यामुळे स्वतःला गुंतवून घेण्यासाठी काही तरी करायचंय. पण उद्योग असा हवा की त्याचा कच्चा माल जवळच उपलब्ध व्हायला हवा. त्यातून अशिक्षित महिलांना रोजगार उपलब्ध व्हायला हवा आणि त्यातून तयार होणाऱ्या उत्पादनासाठी बाजारपेठही जवळच हवी. असा विचार करत असतानाच निर्मला कांदळगावकर यांना कच्चा माल सापडला जो सगळीकडे सहज उपलब्ध असतो, कचरा!

कचरा प्रत्येक घराघरातून रोजच्या रोज तयार होत असतो. गावात तो उकिरड्यावर फेकला जातो तर शहरात पालिकेच्या गाडीतून नेऊन डम्पिंग ग्राऊंडवर ओतला जातो. एकेका शहरातून शेकडो टन कचरा निर्माण होतो आणि तो साचत जाऊन डम्पिंग ग्राऊंडवर कचऱ्याचे डोंगर तयार होत राहातात. आता हा ज्वलंत प्रश्न मानला जात असला तरी २००० मध्ये जेव्हा निर्मला यांनी या विषयावर काम करायचं ठरवलं त्या वेळी याची व्याप्ती आणि तीव्रता फारशी कोणाला भिडली नसावी. पण दूरदृष्टीच्या निर्मला यांनी या विषयावर अभ्यास सुरू केला. पारंपरिकरीतीने कचरा विभक्तीकरण आणि विघटन या दोन्ही गोष्टी खूपच वेळखाऊ होत्या. त्यांनी कृषी विद्यापीठात पर्यावरण विज्ञान या विषयात पदव्युत्तर पदविका घेत दोन वर्षं या विषयाचा अभ्यास केला आणि शास्त्रोक्त पद्धतीने कचरा विल्हेवाटीच्या पद्धती शिकून घेतल्या. सुरुवातीला आसपासच्या गावात सभा घेऊन लोकांमध्ये या प्रश्नाबद्दल जागरूकता निर्माण करायला सुरुवात केली.

तरच हे प्रकल्प यशस्वी होतात हे निर्मला आवर्जून सांगतात.

पुढे सरकारी कामकाजात सोप्पं पडावं यासाठी २००७ मध्ये कंपनी प्रायव्हेट लिमिटेड झाली आणि आता ‘विवाम’ सॉलिड वेस्ट मॅनेजमेंट प्रा. लि’ या नावाने प्रसिद्ध आहे. निर्मला यांचे पती, मुलगा आणि मुलगीही आता ‘विवाम’मध्ये कार्यरत आहेत. आता कंपनीचे कामकाज खूप वाढले असून त्यांची स्वतःची इंजिनीअर टीम आहे. विविध प्रकारचे संशोधन करणे, ग्राहकाच्या गरजेनुरूप मशीन बनवून देणे ही कामे या टीममार्फत केली जातात. खत आणि वीज निर्माण करणारे मशीन, पालिकेकडे येणारा टनावारी मिश्र कचरा विभक्त करणारे मशीन, प्लास्टिक कचऱ्याची विल्हेवाट लावणारे मशीन, एका दिवसात कचऱ्यापासून खत निर्माण करणारं मशीन, कचरा वाहून नेणारी वाहने, अशा एक ना अनेक गोष्टी ‘विवाम’मार्फत बनवल्या जातात.

पण सगळाच्या सगळा कचरा एका जागी नेऊन त्याचे विघटन करण्यापेक्षा स्थानिक पातळीवरही प्रयत्न केले पाहिजेत असं त्यांना वाटलं आणि त्यामुळे घरच्या घरी अगदी कमी जागेत गांडूळ खत आणि बायोगॅस तयार करायचं उपकरणही त्यांनी लोकांना उपलब्ध करून दिलं आहे. निर्मला म्हणतात की, आपल्याकडे टीव्ही, फ्रिज, वॉशिंग मशीनसाठी जागा असते, तशीच या उपकरणासाठीही छोटी जागा ठेवायची. त्याचा वास वगैरे येत नाही आणि तुमचा ओला कचरा शून्य होतो. सगळा कचरा आपणच निर्माण करतो त्यामुळे ‘कचऱ्याला आपलं म्हणा’ हे त्यांचं ब्रीदवाक्य आहे.

